
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## ‘रेमल’ चक्रीवादळ आज किनार्यावर धडकणार; चक्रीवादळ म्हणजे काय? ही वादळं कशी तयार होतात? सविस्तर जाणून घ्या



सध्या देशातील वेगवेगळ्या भागांत वेगवेगळे वातावरण पाहायला मिळत आहे. हवामान बदलाचा परिणाम देशाच्या प्रत्येक भागात दिसून येत आहे. कुठे तीव्र उष्णतेची लाट; तर कुठे अवकाळी पावसाची नोंद करण्यात आली आहे. मात्र, आता देशावर आणखी एक संकट घोंगावत आहे. पश्चिम किनारपट्टी भागात आज तीव्र चक्रीवादळ धडकणार असल्याचा इशारा भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) दिला आहे. ‘रेमल’ चक्रीवादळ आज संध्याकाळी ६ च्या सुमारास पश्चिम बंगालच्या सागर बेट आणि बांगलादेशच्या खेपुपारा किनार्यावर धडकण्याची शक्यता आहे, असे शुक्रवारी (२५ मे) ‘आयएमडी’ने सांगितले आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२४३ रविवार दि.२६ मे २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -243 SUNDAY DT. 26 MAY 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

■ तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जोगलादेवी नदीपात्रातून दिवसाढवळ्या खुलेआम वाळू उपसा

■ तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे बोकाळले!

## महसूल विभागाच्या आणि पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गेवराई तालुक्यात वाळू माफियांचे चांगभले

# माफिया बोकाळला!

## कधी देणार लक्ष?: सर्रास सुरु असलेल्या वाळू उपशाकडे पोलीस व महसूल विभागाची बघ्याची भुमिका!

सपोनि नरके साहेब जोगलादेवी आपल्या ठाण्याच्या हद्दीत येत नाही का?







सपोनि नरके साहेब वाळू माफियांसोबत तुमचे धागेदोरे काय आहेत हे जनतेला दाखवून द्याल का?

तलवाडा पोलीस ठाण्याचे प्रमुख व डीवायएसपी राजगुरू हे वाळू माफियांवर कारवाई का करत नाहीत?

डीवायएसपी राजगुरू साहेब आपण गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्राचे पाप आपल्या अंगी घेऊ नका!



बाहेरील पथक येवून कारवाई करत असतील तर, तुम्हाला ठाणे प्रमुखाची जबाबदारी कशासाठी दिली आहे?





### गेंड्याची कातडी पांघरलेला हप्तेखोर भामटा कोण ?

वाळू उपसा करणाऱ्या टीप्पर मालकांकडून वसुली कोण करतंय ? वाळू तस्करांच्या संपर्कात कोण आहे ? जमा केलेला हप्ता कोणाला जातो ? हा हप्ता गोळा करण्यासाठी व्हाट्सअपच्या माध्यमातून वाळू माफियांना फोनवर कोण बोलतंय ? जमा झालेला मलिदा जमा करणारा गेंड्याची कातडी पांघरलेला हफ्तेखोर भामटा कोण ? याची चवीने चर्चा केली जात आहे.

■ पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा चक्क ग्रामस्थांना अडवावा लागला; पोलीस प्रशासन करतंय तरी काय?

तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळू माफियांनी धुमाकूळ घातला आहे. अवजड वाहनांमुळे गोळेगाव-जातेगाव रस्त्याची दुरवस्था झाली आहे. वाळू माफियांची वाहने भरधाव वेगाने जात असल्यामुळे जातेगाव येथील ग्रामस्थांनी बुधवारी ७ वाजण्याच्या सुमारास अवैध वाळूची वाहतूक करणारा हायवा अडविला होता. चक्क वाळू माफियांच्या विरोधात रस्त्यावर उतरून अवैध वाळूचे वाहने अडविण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. मग हे पोलीस प्रशासन करतंय तरी काय? असा प्रश्न ग्रामस्थांची केला आहे.

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या गोदापात्राची वाळू माफियांनी अक्षरशः चाळणी केली आहे. शासनाचा महसूल बुडवत वाळू माफिया अवैधरीत्या वाळू उपसा करत असून, याकडे पोलीस व महसूलचे दुर्लक्ष होत आहे. तलवाडा, गोळेगाव, जातेगाव मार्गे वाळू वाहतूक करणारे हायवा सुसाट वेगाने जात असल्याने नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता, तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### वाळू माफियांची एवढी दादागिरी कुणाच्या जीवावर वाढली? बोरगाव येथे वर्चस्व वादातून वाळू माफियांच्या दोन गटांत तुफान राडा

गेवराई : तालुक्यातील बोरगाव परिसरात रात्री अचानक जाधव आणि ढाकणे गटात वाळूच्या कारणावरून तूफान राडा झाल्याची घटना (२४ मे ) रोजी रात्री घडली असून या घटनेत सहाजन गंभीर जखमी असल्याची माहिती असून त्यांच्यावर बीड व संभाजी नगरच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चकलांबा पोलिस ठाणे अंतर्गत बोरगाव बु. परिसरात गोदापात्र आहे. बोरगाव हे गेवराई तालुक्याच्या हद्दीत आहे. पलीकडे नगर जिल्हा आहे. नेहमीच मुंगी येथील वाळू माफिया या परिसरात दहशत माजवत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. परंतु, याबाबत कधी कोणतीही कार्यवाही झालेली नाही. वाळू उपसावरून गावातील जाधव आणि मंगी येथील ढाकणे गटात वर्चस्ववादातून तूफान हाणामारी झाली. तसेच या घटनेत सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच रोडवर मोटार सायकलही जाळण्यात आल्या आहेत.

तलवाडा / प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील जोगलादेवी येथून मागील काही दिवसांपासून बेसुमार अवैध वाळू उपसा होत असताना महसूल व पोलिस प्रशासन कोणतीही कारवाई करीत नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणात अवैध देशी दारू, गावठी हातभट्टी दारू, मटका, जुगार, गांजा, गुटखा, पत्याचा क्लब, असे अनेक अवैध धंद्यांचे स्तोम माजले आहेत. याकडे तलवाडा पोलीसांची बघ्याची भुमिका आहे. मागील काही महिन्यांपूर्वी अधूनमधून उपसा सुरूच होता. मात्र मागील काही दिवसांपासून वाळूमाफियांनी जोगलादेवी नदीपात्रातून दिवसाढवळ्या खुलेआम मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू केलेला आहे. सदर वाळू उपशामुळे परिसरातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. परंतु याकडे तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके आणि महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष करून आर्थिक तडजोड केली जात आहे. जोगलादेवी या नदीपात्रातून वाळुचा सर्रास उपसा होत आहे. तसेच ही वाळू हायवा, टिप्पर, ट्रॅक्टरच्या सह्याने तलवाडा पोलीसांच्या नाकावर टिच्चून वाळू वाहतूक केली जात आहे. त्या ठिकाणाहून वाळु उपसा दिवसाढवळ्या होत असताना हे तलवाडा पोलीसांना दिसत नाही का? का तलवाडा पोलीसांना वाळू माफियांकडून मलिदा मिळत आहे? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे.

तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नदीपात्रातून अवैध वाळू उपसा सर्रास सुरू असल्याने वाळू माफियांनी नदीपात्राचे अक्षरशः चाळण केली आहे. तसेच अवैध वाळू उपसा सर्रास सुरू असल्याने शासनाचा महसूल बुडत असल्याने शासनाच्या तिजोरीला फटका बसत आहे. संतापजनक म्हणजे सर्रास सुरू असलेल्या वाळू उपशाकडे पोलिस आणि महसूल विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने सध्या वाळू माफियांचे चांगभले झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सर्रास वाळू उपसा सुरू असताना महसूल आणि पोलिस प्रशासनाने सुद्धा मौन बाळगले आहे. पोलीस प्रशासनाच्या आणि महसूल विभागाच्या उदासीन धोरणामुळे गेवराई तालुक्यात वाळू माफियांचे चांगभले होत आहे. वाळू माफियांना आळा घालण्यासाठी स्थानिक प्रशासन आर्थिक तडजोडीपोटी दुर्लक्षित धोरण सध्या दिसून येत आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे गरीब वर्ग, घरकुलधारक अवाजवी भावाने वाळू खरेदी करीत असून, त्यांच्या खिशाला कात्री लागत आहे. तर वाळू माफिया मात्र गब्बर होत चालले असून, पोलीस प्रशासनातील काही शुक्राचार्याला दावणीला बांधून दिवसाढवळ्या सर्रास बिनबोभाटपणे वाळूची अवैध वाहतूक सुरू असल्याचे चित्र तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीसह तालुक्यात दिसत आहे. स्थानिक प्रशासन मात्र थातुरमातूर कारवाई करून वरिष्ठांकडून पाठ थोपटून घेण्यात यशस्वी होताना दिसत आहे. या अवैध वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनीच पुढाकार घ्यावा, अशी मागणी गोदाकाठासह गेवराई तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांकडून होत आहे.

तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जोगलादेवी नदीपात्रातून हायवा तसेच ट्रॅक्टरच्या सहाय्याने बिनबोभाटपणे वाळूचा बेसुमार उपसा करीत आहे. याकडे प्रमुखाने लक्ष देवून यावर कारवाई कोण करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# लोकेशन वाल्यांच्या नाकावर टिचून अपर जिल्हाधिकारी यांची अंबड मध्ये कारवाई

## जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण पांचाळ यांची अवैधरित्या होत असणाऱ्या गौण खनिज चोरांवर करडी नजर असल्याचे सिद्ध झाले

काल तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शहागड मध्ये ३० ब्रास वाळू साठा जप्त गेल्यानंतर रात्रीपर्यंत ते गस्तीवर होते . त्यानंतर सकाळी चार वाजेच्या सुमारास अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी गस्तीवर असताना ही कारवाई केली. त्यांच्यासोबत बालाजी पापुलवाड , अव्वल कारकून , जिल्हाधिकारी कार्यालय जालना , संतोष खरात , महसूल सहाय्यक , राम मोहिते संगणक चालक , शिवाजी कोल्हे, सुरक्षारक्षक , अशोक कमाने, वाहन चालक हे होते .

शहागड ते छत्रपती संभाजीनगर या हायवेवर हरिओम हॉटेलच्या समोर शहागडकडे जाताना अंदाजे एक किलोमीटर अंतरावर वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन हायवा मेत्रेवार यांच्या दिसल्या . त्यांनी पथकाला सांगून सदर हायवा चौकशीसाठी थांबविल्या . भारत बेंज कंपनीच्या दोन हायवा थांबविण्यात आल्या . दोन्ही हायवांचे ड्रायव्हर अनुक्रमे परसराम प्रल्हाद जाधव व राहुल शेषराव गडवे हे होते . दोन्ही चालकांकडे वाळू वाहतुकीचा परवाना अथवा पास आहे काय याबाबत मेत्रेवार यांच्या पथकाने चौकशी केली . दोन्ही चालकांनी सांगितले की त्यांच्याकडे अशा प्रकारचा कोणताही परवाना नाही . दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी पाच ब्रास वाळू दिसून आली . सदर वाहन चालक हे अवैधरित्या वाळूची वाहतूक करीत असल्याचे सिद्ध झाल्याने पुढील कारवाईसाठी दोन्ही हायवा पोलीस स्टेशन गोंदी येथे नेण्यात आल्या . दोन्ही हायवांची ताबा पावती करण्यात आली आणि वाहने पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली . सदर घटनेचा पंचनामा गोंदीचे तलाठी किरण जाधव यांनी केला .




अपर जिल्हाधिकारी रीता मेत्रेवार यांनी अंबड तालुक्यात सलग दोन कारवाया केल्यामुळे वाळूतस्करांचे व लोकेशन वाल्यांचे धाबे दणाणले आहे . सकाळी हायवाचे मालक लोकेशन ठेवणाऱ्यांची कानउघाडनी करत होते ,अशी कुजबुज सुरू आहे . यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी म्हटले की अशाच प्रकारे जिल्हास्तरावरून सुद्धा पथक सतत फिरणार आहे . त्यामुळे कोणीही अवैधरित्या वाळू , मुरूम अथवा मातीची वाहतूक करू नये . भोकरदन , जाफराबाद , बदनापूर , मंठा तालुक्यात वाळूघाट सुरू आहेत . ज्या नागरिकांना बांधकामासाठी अथवा व्यावसायिकांना बांधकामासाठी अथवा इतर कारणासाठी वाळू हवी असल्यास त्यांनी रीतसर घाटावरून वाळू आणावी . त्यासाठी रितसर मागणी नोंदवावी लागते . तसेच त्यांनी असेही सांगितले की वाहन पकडल्यानंतर अथवा साठा जप्त करण्यात आलेली वाळू ही नियमानुसार घरकुलधारकांना आणि शासकीय कामे सुरू असते असल्यास अशा कामांसाठी शासकीय दरानुसार देण्याबाबत सर्व तहसीलदार यांना सूचित करण्यात आलेले आहे . त्यामुळे कोणीही वाळू चोरण्याच्या भानगडीत पडू नये .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की वरिष्ठ अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार सदर वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल . त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात येईल . तसेच सर्व नागरिकांना आवाहन केलेले आहे की कोणत्याही गावातून वाळूचा अवैधरित्या उपसा अथवा वाहतूक होत असल्यास तात्काळ माझ्याशी संपर्क साधावा . गावातील मंडळ अधिकारी, तलाठी किंवा जवळचे पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधून अवैधरित्या होत असलेली वाळू वाहतूक बंद करण्यासाठी प्रशासनाला मदत करावी .

मागील काही दिवसापासून प्रशासनाकडून सतत होत असलेल्या कारवायांमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे .




## ऋषीतुल्य प्राचार्य डॉ.गाढवे यांचे निधन

गेवराई (प्रतिनिधी)

येथील र भ अट्टल महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ मारोतीराव गाढवे यांचे पुणे वाकड येथे अल्पशा आजाराने शुक्रवारी सकाळी आठ वाजता निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यूसमई त्यांचे वय ७५ वर्ष होते.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी अट्टल कॉलेज, सुंदरराव सोळुंके कॉलेज माजलगाव येथेही प्राचार्य म्हणून उत्तम काम केले. ते बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात व्यवस्थापन समितीचे सदस्य होते. प्राचार्य गाढवे यांचा स्वभाव शांत संयमी मितभाषी होता. अत्यंत विद्यार्थिप्रिय शिक्षक शिस्तप्रिय प्रशासक होते.त्यांनी गेवराईत मोठा संपर्क ठेवला होता. प्राचार्य गाढवे सर यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# बीड जिल्ह्यातील बोगस मतदानाचे व्हिडिओ जुने

## निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण




मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील बीड लोकसभा मतदारसंघासह इतर काही ठिकाणी मतदानादरम्यान गैरप्रकार आणि ईव्हीएम छेडछेडीच्या घटना समोर आल्या होत्या. यामुळे बीड जिल्ह्याची बदनामी होत असल्याचे निवेदन धनंजय मुंडे यांची विश्वासू वाल्मीक (अण्णा ) कराड यांनी जिल्हाधिकारी यांना दिले याबाबत जिल्हाधिकारी यांनीही तात्काळ निवडणूक आयोगाकडे याबाबतची शिफारस केली असता.यावर निवडणूक आयोगानं हे सर्व व्हिडिओची तपासणी केली असता ते सर्व व्हिडिओ जुनी किंवा बाहेरील राज्यातील असल्याचे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने दिले असून हे सर्व व्हिडिओ जुने असून त्याचा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीशी संबंध नसल्याचं म्हटलं आहे.

महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयानं ट्विट करुन याबाबत माहिती दिली आहे. ट्विटमध्ये म्हटलं आहे की, काही व्यक्ती निवडणूक प्रक्रियेला बाधा पोहचवणारी कृती करतानाचे आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत छेडछाड करण्याचा प्रयत्न करत असतानाच्या इतर राज्यांमधील जुन्या चित्रफिती समाज माध्यमांवर फिरत असल्याचं निदर्शनास आलं आहे. या चित्रफिती लोकसभा निवडणूक २०२४ अंतर्गत महाराष्ट्रातील मतदान प्रक्रियेशी संबंधित नसल्याचं स्पष्ट झालं आहे. राज्यातील मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडली आहे.असे हे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनी निवडणूक आयोगाकडे दिलेले १०० व्हिडिओ हे खोटे आणि फर्जी असल्याचे सिद्ध झाले आहे.

# दहावीचा निकाल उद्या सोमवारी

पुणे : प्रतिनिधि

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या निकालाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी या संदर्भातील घोषणा परिपत्रकाद्वारे केली. त्यानुसार येत्या सोमवारी म्हणजेच २७ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालाबाबतची उत्सुकता आता संपुष्टात येणार आहे.



बारावीचा निकाल २१ मे रोजी जाहीर करण्यात आला होता. त्याच दिवशी दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर होणार असल्याची चर्चा होती. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थी दुपारी एक वाजल्यापासून ऑनलाइन निकाल पाहू शकतात. https:// mahresult.nic.in, http:// sscresult.mkcl.org, https:// sscresult.mahahsscboard.in, https:// results.digilocker.gov.in, https:// results.targetpublications.org या संकेतस्थळांद्वारे निकाल पाहता येणार आहे.

ऑनलाइन निकालानंतर दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mh-ssc.ac.in) स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करता येईल. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी २८ मे ११ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करून शुल्क भरता येईल.

मार्च २०२४ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन अर्ज मंडळाच्या अधिकृत

(उर्वरीत पान २ वर)

# बीडच्या कलेक्टर, तहसिलदार मुंडेंना मतमोजणीत भाग देऊ नका-सोनवणे

बीड (प्रतिनिधी)

**लोकसभा निवडणुकांपूर्वी प्रचारावेळी बीड जिल्ह्यातील वातावरण चांगलंच तापलं होतं. बीडमध्ये मराठा आणि ओबीसी वाद ऐन निवडणुकीत उफाळून आला. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षण मागणीचे केंद्रस्थान असल्याने बीडमध्ये मराठा समाज एकटवला होता. त्यातच, शरद पवार यांनी महाविकास आघाडीकडून बजरं सोनवणेंना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे, भाजपच्या पंकजा मुंडेंविरुद्ध बजरंग सोनवणे असा सामना रंगला. त्यातच, मराठा विरुद्ध ओबीसी असे जातीय वळण या निवडणूक लढाईला मिळाल्याने बीडमध्ये मतदानादिवशीही अनेक घटना घडल्या. त्यावरुन, आता मतमोजणीपूर्वीच वाद होत आहे. बीडमधील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाकडे वेगळीच मागणी केली आहे.**



बीड जिल्ह्यात या लोकसभा निवडणुकीमध्ये रेकॉर्ड ब्रेक मतदान झालं आहे. यंदा येथील मतदानाची टक्केवारीही वाढल्याचं पाहायला मिळालं. केवळ मराठवाडाच नाही तर राज्यभरात पहिल्या ५ सर्वाधिक मतदारसंघात बीडचा समावेश आहे. बीडमध्ये ७०.९२ इतके मतदान झाले आहे. मात्र, बीडमध्ये बोगस मतदान होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने मतदान झाल्यानंतर एकानंतर एक व्हिडीओ बाहेर काढले आणि त्यानंतर निवडणूक आयोगाने सुद्धा बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्याकडे खुलासा मागितला. बीडच्या जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही बोगस मतदान झाले नसल्याचे सांगितले असले तरी निवडणूक आयोगाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तक्रारीनंतर काही ठोस पाऊले उचलावी लागणार आहेत. त्यातच, आता मतमोजणीच्या अनुषंगाने बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाकडे महत्त्वाची मागणी केली आहे. आयोगाकडे पत्रातून केली आहे.

# गुजरातच्या राजकोटमधील गेमिंग झोनमध्ये भीषण आग; १६ जणांचा मृत्यू



आगीत अडकलेल्यांना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.


गुजरातच्या राजकोट शहरातील एका गेमिंग झोनमध्ये शनिवारी संध्याकाळी भीषण आग लागली. यामध्ये जवळपास १६ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. टीआरपी गेम झोन येथे लागलेल्या आगीत अनेक लहान मुले आणि मोठी माणसे अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अग्निशामक दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्याअसून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

राजकोटचे जिल्हाधिकारी प्रभाव जोशी यांनी पीटीआय वृत्तसंस्थेशी बोलताना या घटनेची माहिती दिली. ते म्हणाले, दुपारी सव्वा चार वाजता कंट्रोल रूमला आग लागल्याची माहिती देणारा फोन आला. त्यानंतर तातडीने अग्निशामक दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. अजूनही आग विझलेली नाही. आग लागल्याच्या ठिकाणी ढिगाऱ्यात शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत १६ लोकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

युवराज सिंह सोलंकी नावाच्या माणसाचा हा गेमिंग झोन आहे, अशी माहिती राजकोटचे पोलीस आयुक्त राजू भार्गव यांनी दिली. गेमिंग झोनच्या मालकावर निष्काळजीपणाचा आणि त्यामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बचाव कार्य पूर्ण झाल्यानंतर पुढील तपास सुरू करण्यात येईल,

# जीबीएस आजार अत्यंत दुर्मिळ, चर्चा मात्र गंभीर!

जीबीएस आजार अलीकडच्या काही दिवसात जाम चर्चेत आला आहे. वास्तविक पाहता जीबीएस आजार हा अत्यंत दुर्मिळ आहे. लाखो-करोडो लोकांमधून एखाद्यालाच हा आजार होतो, असे तज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे. शिवाय हा आजार काही नवीन नाही, बऱ्याच वर्षांपासून अस्तित्वात आहे. अलीकडील काही दिवसात या आजारावर चर्चा मात्र अतिशय गंभीरपणे होत आहे. म्हणून या आजारावर हा लेख प्रपंच. कृपया संपूर्ण लेख आवर्जून वाचावा. बहुतेक या आजाराविषयी होत असलेली चर्चा व भीती दूर होईल.




आजार कोणताही असो वेळीच औषधोपचार घेतल्याने तो निश्चितपणे बरा होतो. ही गोष्ट लक्षात ठेवा आणि कृपया जीबीएस आजाराचं कोरोना सारखं बाऊ करू नका. घाबरून जाऊ नका. लक्षणे दिसून आल्यास वेळीच तपासण्या करून उपचार करून घ्या. तसे पाहता जीबीएस हा आजार काही नवीन नाही. गेल्या अनेक वर्षांपासून तो अस्तित्वात आहे. हे आपण युट्युब वर किंवा गुगल वर जाऊन पाहिले तर सहज दिसून येईल. गेल्या काही वर्षात युट्युब वर या आजाराविषयी अनेक व्हिडिओ अपलोड केलेले आपल्याला दिसून येतील. तसेच गुगल वर सुद्धा याविषयी भरपूर माहिती उपलब्ध आहे. आपण या जीबीएस आजाराविषयी युट्युब आणि गुगल वर पाहू शकता. असे असताना जर कुठे या आजाराचे रुग्ण समोर येत असतील तर त्याचा बाऊ करून इतरांना घाबरवून सोडण्याचे काही एक कारण नाही. जीबीएस या आजाराला दुर्मिळ म्हणून ओळखले जाते. दुर्मिळ या शब्दाचा अर्थच मुळात क्वचित आढळणारा असा होतो. म्हणून हा आजार काही सर्दी, पडसे, खोकला, ताप यासारखा अनेकांना होत नाही हे निश्चित. शिवाय या आजाराचा स्वतंत्र असा कोणताही व्हायरस नाही. म्हणून हा आजार जडताना जी काही लक्षणे आढळू शकतात त्यापैकी कोणतेही लक्षण आपल्यात आढळून आले तर सर्वप्रथम तज्ञ डॉक्टरांना दाखवून आवश्यक त्या तपासण्या करून योग्य ते उपचार करून घ्यावेत. कारण आजार कोणताही असो त्याचे वेळीच निदान करण्यात आले तर तो हमखास बरा होतो. माणूस एकापेक्षा एक भयंकर आजारांना पुरून उरला आहे हे लक्षात घ्या. काही वर्षांपूर्वी पर्यंत मानवाच्या फुफ्फुसांना चाळणीसारखा करणारा क्षयरोग देखील आता जवळपास हद्दपार होत आला आहे. कर्करोगावर यशस्वीपणे उपचार होत आहेत. एड्स सुद्धा देशात आला होता की नव्हता असा झाला आहे. तेव्हा जीबीएस आजाराचं कोरोना सारखं बाऊ करू नका, घाबरू नका, लक्षणे दिसताच वेळीच तपासण्या करून उपचार करून घ्या. लक्षात घ्यावे की, जीबीएस या आजाराचा कोणताही स्वतंत्र असा व्हायरस नाही. ज्याच्या शरीरात रोगप्रतिकारक शक्ती कमी असते किंवा ज्याची रोगप्रतिकारक शक्ती क्षीण होते त्याला हा आजार होऊ शकतो. बॉयलर चिकन खाण्यामुळे हा आजार होतो ही सुद्धा एक शुद्ध अफवा असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

जीबीएस या आजाराची काही लक्षणे

सुरुवातीला सर्दी, खोकला येणे. शरीराच्या नसांवर आघात होणे. सुरुवातीला पाय दुखणे. हात-पाय लुळे पडणे. हातांच्या नसा कमजोर होणे. हाता पायाला मुंग्या येणे किंवा बधीर होणे. स्नायू कमजोर होणे. चालताना, बोलताना अडथळे येणे. गिळायला त्रास होणे. प्रचंड थकवा जाणवणे. श्वास घेण्यास त्रास होणे. आजार जास्त वाढल्यास उठणे-बसणे ही अवघड होणे. हात खांद्यांपासून वर न होणे. आजार जास्तच वाढल्यास डोक्यावर ही परिणाम होऊ शकतो. कारण जीबीएस मुळे मानवाच्या शरीरातील रोग प्रतिकारशक्ती व्हायरसवर अटॅक करण्याऐवजी आपल्या शरीराच्या नसांवरच हल्ला करते. ही त्याची लक्षणे असू शकतात.

कोरोना होऊन गेलेल्यांना

कोरोनाच्या लाटेत कोरोनातून बरे झालेल्या रुग्णांना जीबीएस हा श्वसनाशी संबंधित दुर्मीळ आजार जडू शकतो. मात्र कोरोनामुक्त रुग्णाला हा आजार होणे हे अत्यंत दुर्मीळ मानले जाते.

## वेळेत उपचार केल्यास रुग्ण दहा दिवसात बरा होतो

वेळेत निदान आणि उपचार झाल्यास रुग्ण जीबीएस च्या आजारातून बरा होऊ शकतो. जसे कोरोना झाल्यास रूग्णाला ऑक्सिजनसह व्हेंटिलेटर लावणे आवश्यक होते, तसे जीबीएस मध्ये प्रत्येक रुग्णाला व्हेंटिलेटर लागू शकत नाही. व्हेंटिलेटर लागणाऱ्या रुग्णांचे प्रमाण साधारण २० ते ३० टक्क्यापर्यंतच असते

## कोरोना सारखाच फुफ्फुसांशी निगडित पण .....

सन २०२० सालच्या मार्च महिन्यात जगाच्या इतर देशासारखाच आपल्या भारतात येवून जवळपास दोन वर्षे थैमान घातलेल्या कोरोना या आजारासारखाच हा जीबीएस चा आजारही फुफ्फुसाशी निगडित आहे. फरक फक्त एवढाच आहे की, कोरोना मानवाला सर्दी-पडसे झाल्यानंतर फुफ्फुसावर अटॅक करत होता तर जीबीएस हा आजार मानवाच्या पायापासून सुरू होऊन फुफ्फुसापर्यंत पोहोचतो.

# अवैध हातभट्टी दारू विक्रीची दुकाने बंद व्हावी या नागरिकांची बैठक

### संभाजीनगर व शहर पोलीस ठाणे येथील पी.एस.आय. यांची घेतली शिष्टमंडळाने भेट

परळी ।प्रतिनिधी

कालरात्री देवी मंदिर परिसरा असलेल्या साठेनगर, भिमनगर या भागात खुले आम, पोलिसांच्या नाकावर टिचुन, राजरोस पणे, मोठ्या प्रमाणात अवैध्य हातभट्टी दारू विक्रीचा व्यवसाय सुरू असून दहा ते पंधरा जण हा व्यवसाय करतात, या सर्वांची नावे व पत्ते देण्यात आला. या भागातील तरुण स्वस्तातली हातभट्टी दारू पिऊन व्यसनाधीन झाला आहे, यामुळे त्याला अनेक आजार होत आहे, अनेक तरुणांचे संसार उध्वस्त झाले आहे, व्यसनाधीनते मुळे तरुणांच्या मृत्यूचे प्रमाण देखील वाढले आहे, या अवैद्य हातभट्टी दारू विक्रेत्यांचा बंदोबस्त व्हावा यासाठी येथील या भागातील सुजाण नागरिकांनी पुढाकार घेऊन जिजामाता उद्यान येथे व्यापक बैठक



घेतली. बैठकीमध्ये विचार विनिमय करून, सर्वानुमते तात्काळ हातभट्टी अवैध दारू विक्री करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी समोर आली. दुपारी ही बैठक पार पडल्यानंतर सायंकाळी सर्वानुमते शिष्टमंडळ परळी शहर पोलीस ठाणे, संभाजीनगर पोलीस ठाणे यांच्या भेटीसाठी गेले व त्यांनी सविस्तरपणे या भागात होणाऱ्या अवैध हातभट्टी दारू विक्रीची सविस्तर माहिती दिली,पोलीस प्रशासनाने यावर कडक, प्रतिबंधक कारवाई करू असे आश्वासन दिले आहे. पोलीस पेट्रोलिंग देखील वाढवण्यात येणार असल्याची माहिती सांगितली आहे.

साठेनगर,भिमनगर, कालरात्री देवी मंदिर परिसर या ठिकाणच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सर्व पक्षीय नेते मंडळींनी केले. त्यामध्ये माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, पीआरपीचे नेते सोपान ताटे, वंचित बहुजन आघाडीचे बालाजी जगतकर, भाजपा नेते रमेश गायकवाड,राष्ट्रवादीचे नितीन रोडे, संतोष आदोडे,प्रताप समिंदरसवळे,राज जगतकर, अँड.अर्जून सोळंके,भैय्यासाहेब आदोडे,निलेश वाघमारे,अभिजित कांबळे,जतिन जगतकर, अनंत कांबळे, बबलु साळवे, किरण तरकसे,अतुल आवचारे,साहेबराव कस्बे,महेश मस्के आदी उपस्थित होते.

# पांच दिवसीय प्रवचन ,किर्तन महोत्सव !

### पाडळी फाटा विठ्ठल वारकरी संस्थेचा तीसरा वार्षीक उपक्रम !

शिरूर कासार : तालुक्यातील पाडळी फाट्यावर लहाण लहाण मुलांवर धर्म संस्कार व कला अवगत व्हावी यासाठी एका तरूणाच्या पुढाकारातून विठ्ठल वारकरी शिक्षण संस्था सुरू झाली त्यात लहाण लहाण मुलांना धर्मसंस्काराबरोबर गायन वादनाचे धडे दिले जातात याशिवाय त्यांच्या मनात वारकरी संकल्पनेचे बिजारोपन होण्यासाठी दरवर्षी प्रवचन व किर्तन हा उपक्रम सुरू केला आहे .रविवार पासून तीसरा महोत्सव सुरू होत आहे .

संत नगदनारायण ,संत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांच्या अशिर्वादाने व महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री व भक्तिदास महाराज यांचे प्रेरणेने रविवारी विजयकुमार गाडेकर पाटील यांचे प्रथम प्रवचन पुष्प तर शांतीब्रम्ह नारायण महाराज डीसले यांचे किर्तन त्यानंतर अनुक्रमे ओंकार वारे ,महादेव सानप शाम महाराज यांचे प्रवचन व नवनाथ महाराज बडे ,भागवताचार्य सुलोचनाताई विघ्ने व स्वामी जनार्धन महाराज मच्छेंद्रगड यांचे किर्तन होणार आहेत .गुरूवारी रोहिदास महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होऊन अजिनाथ शिरसाट व अशोक नागरे यांचा महाप्रसाद होणार आहे .भाविकांनी मोठ्या संखेने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक मृदंग विशारद संतोष मिसाळ यांनी केले आहे .

# ज्ञानेश्वर काटकर यांना पितृशोक !

शिरूर कासार : प्रशांत बाफना

शिरूर कासार येथील रहिवासी तथा भांडी व लोखडी साहित्य विकृती ज्ञानेश्वर अशोक काटकर यांचे वडील अशोक रघुनाथ काटकर शनीवारी पहाटे एकच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले ते मृत्यूसमयी ७३ वर्ष वयाचे होते .त्यांचेवर अमरधाम स्मशान भुमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांचे पश्चात तीन मुल ,सुना ,तीन विवाहीत मुली ,जावाई ,नातवंडे असा मोठा परिवार आहे

# दहावी नापास मुन्नाभाईनं संपूर्ण मराठवाड्यात पसरविलं गर्भलिंग निदानाचं जाळं

### मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश



**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) : चार दिवसांपूर्वी महानगरपालिकेनं शहरात अवैधरीत्या गर्भपात करणारं सेंटर उघड केलं. त्याचे धागेदोरे आता सिल्लोड मार्गे थेट जालना आणि बीड पर्यंत जाऊन पोहोचलेत. जानेवारी महिन्यात गेवराईमधून पोलिसांच्या छाप्यात धक्का देऊन पसार झालेला डॉ. सतीश गवारे हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व गर्भपाताचे डॉक्टर आणि एजंटच्या संपर्कात होता. संपूर्ण मराठवाड्यात आवश्यकतेनुसार गर्भलिंगनिदानासाठी जात होता. दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन गर्भलिंगनिदानासाठी ५५ हजार रुपये, तर स्थानिक पातळीवर ३० ते ४० हजार रुपये दर आकारत होता. पुंडलिकनगर पोलिसांनी शहरातील गुन्ह्यातही त्याला आरोपी केलं असून, त्याचा नव्यानं शोध सुरू झालाय.**

दहावी नापास झाला डॉक्टर : मूळ जालन्याचा असलेला सतीश गवारे दहावी नापास आहे. मात्र, स्वतःला बीएएमएस डॉक्टर सांगून तशी बनावट डिग्रीदेखील तो दाखवत होता. जून २०२२ मध्ये गर्भपातादरम्यान एका महिलेच्या मृत्यूनंतर याचा हा कारभार उघडकीस आला. त्यातून जामिनावर सुटल्यानंतर जानेवारी २०२४ मध्ये गर्भपाताच्या रॅकेटमध्ये तो रंगेहाथ पकडला गेला. मात्र, तेव्हा पसार झाल्यापासून अद्यापही तो पोलिसांच्या हाती लागलेला नाही. १ लाख ७५ हजार रुपयांचे मशीन आणि २५ हजारांचे बडॉमिनल अल्ट्रा साउंड प्रोब अडॉप्टरद्वारे तो लिंगनिदान करायचा. बीड पोलिसांच्या तपासात जवळपास २ वर्षांचे रेकॉर्ड सापडले होते.

सिल्लोड तालुक्यात सापडले अवैध रुग्णालय : संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागानं गारखेडा भागात अवैध गर्भपात केंद्र उघडकीस आणले होते. त्याचा तपास पुंडलिकनगर पोलिसांनी सुरू केला. त्याचे अनेक धागेदोरे आणि धक्कादायक माहिती समोर येत गेली. त्यात सिल्लोड मध्ये डॉ रोशन ढाकरे आणि डॉ. किरण ढाकरे हे डॉक्टर दांपत्य प्रसुतीची परवानगी नसतानाही, अवैध गर्भपात करत असताना आढळून आले. त्यांच्यावर कारवाई केली असून या प्रकरणी आतापर्यंत अल्पवयीन मुलासह १० जणांना ताब्यात घेतलं असल्याची माहिती पुंडलिक नगर पोलिसांनी दिली. तर गेल्या सात दिवसांपासून या रॅकेटचा पाठपुरावा करण्यात पोलिसांना यश आलंय. एक मोठा रॅकेट पोलिसांच्या हाती लागले. सिल्लोड येथील रुग्णालयात अवैध गर्भपात झाल्यावर मोकळ्या जागेवर अभ्रकाचे तुकडे करून पिशवीत भरून देत असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आलीय.

छत्रपती संभाजी नगर शहरातील गारखेडा परिसरात असणाऱ्या देवगिरी अपार्मेंट या उच्चभूमी वसाहतीमध्ये गेल्या आठवड्यात महापालिकेच्या आरोग्य विभागानं आणि पुंडलिक नगर पोलिसांनी संयुक्तपणे छापेमारी करत गर्भलिंग निदान सेंटर उद्धवस्त केले. याप्रकरणी पॉलिटेक्निक करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीला आणि तिच्या आईला पोलिसांनी ताब्यात घेतलं. १२ लाख ७८ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम आणि गर्भपात करण्यासाठी वापरण्यात येणार असलेल्या लॅपटॉप, सोनोग्राफी मशीन, मोबाईल आणि इतर काही केमिकलदेखील पोलिसांनी जप्त केलं होतं. जिल्ह्यातील वाळूज महानगर परिसरात असणाऱ्या बकवा नगर भागातगर्भपात आणि गर्भलिंग निदान सेंटर चालविणाऱ्या फरार आरोपी आशा वर्कर वैशाली जाधव हिला ४ महिन्यानंतर पोलिसांनी बेड्या ठोकल्यात.

अवैधरित्या गर्भपात करण्यासाठी औषधी आणि किट पुरविणाऱ्या दोघांनाही पोलिसांनी जेरबंद केलंय. वैशालीनं राहत्या घरी सुरभी मदर केअर सेंटर स्थापन करून अवैधरित्या गर्भपाताचा गोरखधंदा सुरू केला होता. या प्रकरणी वैशालीची कसून चौकशी केली. तिनं गर्भपात करण्यासाठी वापरण्यात आलेल्या गोळ्या सुनील मेघारे आणि डॉक्टर गणेश सवंडकर यांना दिल्याचं सांगितलं.



# नियमबाह्य कामे करायला नकार दिल्यामुळं निलंबन

:आरोग्य अधिकाऱ्याचे मुख्यमंत्री शिंदेंना खळबळजनक पत्र, एका मंत्र्यावर आरोप

पुणे - पुणे महापालिकेचे निलंबित आरोग्य अधिकारी भगवान पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रामुळे मोठी खळबळ उडाली आहे. महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ प्रकरणात आणि विभागातंर्गत आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवत पुणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या कारवाईनंतर डॉ. भगवान पवार यांनी गंभीर आरोप केला आहे.

हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याच्या उद्देशाने निलंबन

भगवान पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राज्याचे मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रात आपण मागासवर्गीय अधिकारी असल्यामुळे हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याच्या हेतूने निलंबन करण्यात आल्याचा दावा भगवान पवार यांनी पत्रात केला आहे. मंत्र्यांनी मला पुणे स्थित कात्रज येथील कार्यालयात वारंवार बोलावून नियमबाह्य टेंडरची कामे, खरेदी प्रक्रियेची कामे व इतर कामामध्ये मदत करण्यासाठी दबाव आणला होता. परंतू मी नियम बाह्य कामात मदत केली नाही व इतर नियमबाह्य कामे केली नाहीत म्हणून माझे निलंबन करण्यात आलेले आहे असा दावा भगवान पवार यांनी केला आहे.

निलंबन मागे घेण्याची भगवान पवारांची मागणी

तसेच निलंबनामुळे माझे मनोधैर्य खचून गेले असून माझे कुटूंब मानसिक तणावामध्ये आहे. निलंबन करताना माझे म्हणणे सादर करण्याची कोणतीही संधी मला दिली नाही. निलंबन मागे घेण्याची मागणी भगवान पवार यांनी पत्रात केली आहे. त्यांच्या या पत्रामुळे आता राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# पुरुषोत्तम पुरी ग्रामपंचायतचा दळभद्री कारभार

## जागोजाग तुंबल्या नाल्या गावात पसरली दुर्गंधी तरी गावाला कोणी वाली नाही.... प्रशासनाने लाखो रुपये खर्च केले तरीही प्यायला पाणी नाही

पुरुषोत्तमपुरी ।प्रतिनिधी

सविस्तर माहिती अशी की पुरुषोत्तम पुरी येथील ग्रामसेवक नामदेव कोकाटे यांचा अजबच कारभार गावात जागोजाग नाल्या तुंबलेल्या असून या नाल्यांचे पाणी रोडवर येऊन खूप दुर्गंधी पसरत आहे नागरिकांना चालण्यासाठी याचा त्रास होत आहे या नाल्यांच्या घाणपाण्यापासून लहान मुले तसेच नागरिकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहेत. गावात जाण्याच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या नाल्या मध्ये माजी उपसरपंच रघुपत शेळके यांच्या फिल्टरचे वेस्टेज पाणी व संडासचे पाणी जाते नाल्या तुंबलेल्या असल्यामुळे पाणी रोडवर उलथून पूर्णपणे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे तरी या घाणीकडे ग्रामपंचायत लक्ष देतेय ना प्रशासक लक्ष देतात मग अशा परिस्थितीत नागरिकांनी न्याय तरी कोणाकडे मागायचा मागच्या वर्षापासून ग्रामपंचायतला सरपंच नसल्यामुळे गावच्या नागरिकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहेत. या घाणीमुळे संडास लागणे, कॉलरा, डायरिया, डेंगू यासारखे आजार पसरत आहेत नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन जर काही जीवित हानी झाली तर याला जबाबदार कोण आहे असे प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहेत. तसेच गावामध्ये पाण्याचा प्रश्न उद्भवला आहे लोकांना पिण्यासाठी व वापरासाठी ग्रामपंचायतच्या पाईप लाईन मध्ये पाणीच येत नाही ग्रामपंचायत चे पाणी फिल्टर हे आठ दिवस चालू महिनाभर बंद असते त्यात पाणी पण बरोबर फिल्टर होत नाही कुलिंग पण होत नाही आणि त्याच पाण्याचे पैसे नागरिकांकडून उकळले जातात प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून पाईपलाईन व विहिरीची सोय केलेली आहे पण सगळा पैसा पाण्यात गेलेला आहे कारण नागरिकांच्या नळाला पाणीच येत नाही. गावात जागोजागी वॉल आहेत पण झोपडपट्टी भागात फक्त एकच वॉल टाकण्यात आलेला आणि लोकसंख्या जास्त आहे त्यामुळे पाईप मध्ये पाणी येत नाही. झोपडपट्टी मध्ये सगळे दलित लोक राहतात मग जाणून बुजून दलित लोकांना टार्गेट करण्यात येते का त्यांच्याच नळाला पाणी का येत नाही.दलितांना आलेला दलित वस्ती चा निधी कुठे खर्च केला आहे अशाप्रकारे नागरिकांची गैरसोय का होतेय. ग्रामसेवक हा फक्त वर्षातून



एक दोन वेळेस गावाला तोंड दाखवतो बाकी फरार असतो ग्रामपंचायतला सरपंच नसल्यामुळे गावचा विकास खंडित झाला आहे गावाला कोणी वाली उरलेला नाही तसेच गावामध्ये प्रशासनाने लाखो रुपयाचे कामे आणली होती पण ती कामे कागदोपत्रीच झालेली दिसतात त्यामुळे नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे जर प्रशासनाने इतके पैसे खर्च करून घाणीचा सामना करावा लागत असेल आणि प्यायला पाणी मिळत नसेल तर तो पैसा कोणाच्या घशात गेला आणि कोणी दाबला असे प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहेत. या प्रकरणांमध्ये प्रशासनाने दखल घेऊन कार्यवाही केली नाही तर नागरिकांमार्फत मोठे आंदोलन करण्यात येईल.

### भीषण दुष्काळ परिस्थितीशी सामना करण्यासाठी

# चारा पाणी आदिची उपाययोजना करावी - राजेंद्र मस्के

जिल्हाभरात भीषण दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून, पिण्याचे पाणी, जनावरांना चारा याची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. सर्व जलसाठ्यातील पाण्याने निच्चांक गाठला आहे. अनेक खेडे गावात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरु झाली. शेतकऱ्यांकडे असलेला चाऱ्याचा साठा संपुष्टात आल्याने पाणी व चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर असून दुष्काळाशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी असे निवेदन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिले. या निवेदनात म्हटले आहे की



मागेल त्या गावांना टँकरणे पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. टँकरसाठी पंचायत समिती स्तरावर संथ गतीने कारवाई चालू आहे. मागणीची तीव्रता लक्षात घेऊन, तातडीने टँकर पुरवावे. आगामी ७ जून पर्यंत पाउस पडला नाही तर, आजच्या पेक्षा चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाने आजच चारा-पाण्याचे नियोजन करावे.तसेच बीड शहरात यापूर्वीच पंधरा दिवसाला पाणीपुरवठा केला जातो. यामुळे सामान्य जनतेला पिण्याचे पाण्याची साठवण करने अवघड आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने अनेक भागातील विहीर, आड, विंधन विहिरी कोरड्या पडल्या आहेत. अनेक ठिकाणी हापशे नादुरुस्ती मुळे पाणी मिळत नाही. दुरुस्तीचे काम जलदगतीने सुरु करावे. बीड शहरात प्रभागनिहाय आवश्यक तेथे तातडीने टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा. अशी मागणी प्रशासनाला केली आहे.




नेकनुर येथे सदगुरु बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी निमित्त संपन्न झालेल्या काल्याच्या कीर्तनाला उपस्थित राहून डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी बंकटस्वामी महाराज आणि मठाचे अधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे आशीर्वाद घेतले व भाविक भक्तांशी संवाद साधला. याप्रसंगी स्वर्गीय लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी नवीन सभागृहासाठी दिलेला शब्दाची वचनपूर्ती केल्याने आनंद व समाधान होत आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.




अर्धामसला (प्रतिनिधि) गेवराई तालुक्यातील अर्धामसला येथे पाणी टंचाई असल्यामुळे टँकर येताच आशा पाण्याच्या टाक्या ठेवलेल्या आहेत छाया:- राजु खळगे

# शिवरस्ता जेसीबीने खोदून अडवला; तहसिल प्रशासन डोके फुटण्याची वाट बघतंय का??

## पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील प्रकार :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा।प्रतिनिधी

दि.२६. पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही शिवारातील गट क्रमांक २५४ मधिल वैद्यकिन्ही ते वैजाळा रस्त्यावरुन वैद्यकिन्ही वैजाळा शिवावरुन पश्चिमेकडे जाणारा रस्ता हरिदास सोपान खुळे आणि विक्रम किसन काळे यांनी जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करुन अडवला असुन तक्रारदार पिराजी उत्तमराव शिंदे यांच्या लेखी तक्रारीनंतर वर्षभरापूर्वी पाटोदा मामलेदार न्यायालयात तहसीलदार रुपाली चौगुले यांनी प्रतिवादी यांना वारंवार नोटीस बजावुनही न्यायालयासमोर हजर झाले नसल्याने मामलेदार अधिनियम १९०६ चे कलम ५ नुसार प्राप्त आधिकारांचा वापर करत अर्जदार पिराजी शिंदे यांचा अर्ज अंशत: मान्य करत वैद्यकिन्ही -वैजाळा दोन गावच्या शिवबांधालगतची जमिन उप अधिक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांच्याकडुन मोजणी करून घेऊन हद्दी खुना निश्चित करून मंडळ अधिकारी दासखेड यांना उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय पाटोदा यांच्या कडुन निश्चित करण्यात आलेल्या हद्दी व खुना नुसार सदरील रस्ता तात्काळ खुला करण्याचे आदेश दि.१७ मे २०२३ रोजी वर्षभरापुर्वीच दिलेले होते मात्र त्याची वर्ष



### ६ एक्कर ऊस रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळला:- तक्रारदार पिराजी शिंदे

आमच्या बापजाद्यापासुन हा शिवरस्ता अस्तित्वात असुन बेडुकवाडी आणि वैद्यकिन्ही येथील शेतकऱ्यांचा रहदारीचा रस्ता आहे. माझ्या रानात ६ एक्कर ऊस असुन दरवर्षी कारखाना किंवा गु-हाळाला पाठवत असतो परंतु यावर्षी वर्षभरापासून रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळुन गेला असुन ४ लाखाचे वैयक्तिक नुकसान झाले आहे.जिल्हाधिकारी , तहसीलदार यांना वारंवार तक्रारी नंतर तत्कालीन तहसीलदार रुपाली चौगुले यांनी गेल्या वर्षी आदेश देऊनही अद्याप रस्ता खुला करून देण्यात आला नाही.

उलटूनही अंमलबजावणी न झाल्याने अखेर प्रकरण हाताघाईवर आले असुन तहसिल प्रशासन नेमकं शेतकऱ्यांच्या डोके फुटाफुटीची वाट पहात आहे की काय असा प्रश्न पडला आहे. आज दि.२६ रविवार रोजी संबंधित प्रकरणी पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना फोनवरून याची कल्पना दिली असता उद्या मंडळ अधिकारी यांना पाठवुन प्रकरणात लक्ष देतो असे आश्वासन दिले.

पाटोदा तालुक्यातील विविध गावांमधील शिवार रस्ते तसेच पाटोदा शहरातील पाटोदा ते चुंभळी फाटा पाणंद रस्त्यांच्या अतिक्रमण प्रश्न असो तहसिल प्रशासन आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी केवळ वेळकाढूपणा पणाची भुमिका घेताना दिसत आहेत.राजकारणी आणि धनदांडगे यांच्या हातातले बाहुले बनुन सर्वसामान्य लोकांना केवळ कार्यालयाचे हेलपाटे मारायला लाऊन कागदोपत्रीच टोलवाटोलवी करताना दिसत असुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानंतर सुद्धा कर्तव्य बजावताना कसुर करत आहेत.कर्तव्यात कसुर करणा-या अधिका-यांवर प्रशासकीय कारवाईची आवश्यकता आहे.

# पठाण इकरा अनम रईस खानचा बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट निकाल

बीड ।प्रतिनिधी

इंदिरा गांधी मेमोरियल उर्दू ज्युनियर कॉलेज बाले पीर बीड ची १२वीची विद्यार्थिनी पठाण इकरा अनम रईस खान हिने यंदाच्या बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेत ८०.५० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सर्व नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले. इकरा अनम ही विद्यार्थिनी एशिया एक्सप्रेसचे दिवंगत पत्रकार मुहम्मद रईस खान यांची मुलगी आहे.



# शैती आणि शैतकरी मायलेकराच नात तर कृषी कार्यालय माऊशिची भुमिकेत !

## उत्पादन वाढीसाठी २८ प्रकारच्या विशेष राबवणार मोहीमा !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

शेती आणि शेतकरी यांच माय लेकराचं अतुट नातं असुन उन वारा पाऊस थंडी अशा चारही परिस्थितीला सामोरे जात शेतकरी हा आपल्या काळ्याआईची सेवा करून तीची खरीप रब्बी अशा दोन हंगामात ओटी भरत असतो तर शेती देखील त्याला आईची उब देत भरघोस पिकाचं दान देत असते यात कृषी कार्यालय हे माऊशिच्या भुमिकेत शेतक-याला मदततीचा हात देत मार्गदर्श करत असते . खरीप हंगामासाठी जसा शेतकरी सज्ज झाला तसेच कृषी कार्यालय देखील २८ प्रकारच्या मोहिमा राबवत उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन करणार आहे .

तालुक्यात भौगोलिक क्षेत्र जवळपास चौसष्ट हजार हेक्टर असुन त्यात ५४१५३ हेक्टर क्षेत्र ऊस व फळबाग विरहीत पेरणी लायक आहे .साधारणपणे या क्षेत्रात दरवर्षी कापुस सोयाबीन ,बाजरी ,तूर ,मुग ,उडीद



अशा प्रकारचा पेरा केला जात असतो ,पिक परिस्थिती व बदलत्या हवामानानुसार किड ,रोगराईचा प्रादुर्भाव असे पिकावर संकट येते यातून पिक वाचवण्यासाठी कोणत्या वेळी कोणती औषध फवारणी जरूरी आहे याबद्दल कृषी कर्मचारी मार्गदर्शन करत असतात .

मे ते जून २४ अखेर पर्यंत २८ प्रकारच्या मोहिमेत बिज प्रक्रिया ,घरगुती उगवण क्षमता तपासणी ,ऊसपाचट व्यवस्थापन ,हुमणी किड नियंत्रण ,प्रमुख पिक तंत्रज्ञान गावनिहाय प्रशिक्षण ,महाडीबीटी अर्ज वाढवणे ,नियंत्रण कक्ष ,फळबाग लागवड ,प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया,आपत कालिन पिक नियोजन ,शेततळे ,पिकस्पर्धा , सरी ओरंबा पध्दतीवर भर ,पुरस्कार निवड ,पाणी टंचाईकाळात फळबाग जतन कसी करायची अशा विवीध बाबीवर मार्गदर्शन देण्यासाठी मोहिमा राबवून जनजागृती केली जात असल्याचे तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके यांनी सांगितले .


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT